# पोलीस आयुक्तालय, अमरावती शहर

दिनांक १६/१०/२०२२ - दैनिक गुन्हे

भाग १ ते ५

| अ. क्र. | पो.ठाणे | गु.र. नं. व कलम | गुन्हयाचा प्रकार | चोरीस गेला माल | गुन्हा घडला ठिकाण | गुन्हा घडला ता.वेळ | गुन्हा दा. ता.वेळ | फिर्यादी नांव पत्ता व वय | अटक/पाहिजे आरोपीचे नांव | भेट देणारे अधि. व वेळ | हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ | १२ |
| १ | बडनेरा | अप क्र. ७८९/२२ कलम ३०७, ५०४, ५०६ भा.दं.वि. | खुनाचा प्रयत्न करून जखमी | - | फिर्यादी यांचे घराचे समोर, ग्राम भानखेडा बु. , ता. जि. अमरावती. | दि. २३/०९/२०२२ चे १०.०० वा. ते दि. २५.०९.२२ चे ११.०० वा. | दि. १६/१०/२०२२ चे १३/१८वा. | एक महिला | मनोज मोहन यादव, वय ४५ वर्षे रा. भानखेडा बु., अमरावती.<br><br>(अटक नाही.) | सहा.पो.आ. श्री. दत्तात्रय ढोले, फ्रेजरपुरा विभाग, अम. शहर , व.पो.नि. बाबाराव अवचार, पो.नि. विजय दिघे, पोउपनि. गजानन बोरवार<br><br>दि. १६/१०/२०२२ चे १३/०० वा. ते १३/४५ वा. | हकीकत अशा प्रकारे आहे की, यातील फिर्यादी या त्यांचे पती यांच्यासोबत दुध विक्रीचा व्यवसाय करतात. फिर्यादीचे घरामागे त्यांच्या म्हशीचे शेणखताची गंजी आहे. त्याला लागुनच आरोपीच्या शेणखताची गंजी आहे. दि. २३.०९.२२ रोजी १०.०० वा. दरम्यान आरोपी हा त्यांच्या शेणखताच्या गंजीतुन खत ट्रॉलीमध्ये टाकत होता. त्याच वेळी आरोपी हा फिर्यादी यांच्या गंजीमधुन शेणखत त्याच्या ट्रॉलीमध्ये टाकत असतांना फिर्यादी व तिचा मुलगा यांनी आरोपीला हटकले असता आरोपीने फिर्यादीसोबत वाद घालुन शिवीगाळ करून मारण्याच्या धमक्या दिल्या. त्यावेळी फिर्यादीचे पती हे बाहेरगावी गेले होते. नंतर फिर्यादीचे पती गावावरून परत आल्यावर दि. २५.०९.२२ चे ११.०० वा. दरम्यान फिर्यादीच्या पतीने आरोपीला फिर्यादीसोबत झालेल्या भांडणाबाबत विचारणा केली असता आरोपीने फिर्यादीचे पतीसोबत वाद घालुन त्याच्या जवळ असलेल्या लाठीने जीव घेण्याच्या उद्देशाने फिर्यादीच्या पतीच्या डोक्यावर झोडपा मारला. त्यामुळे फिर्यादीच्या पतीच्या डोक्यावर मागील बाजुस जखम होऊन त्यांच्या तोंडातुन व नाकातुन रक्त निघाले व उलटी झाली. फिर्यादीने तिच्या जखमी पतीस दवाखान्यात नेले. त्यांची प्रकृती बिघडल्याने त्यांना नागपुर सिम्स हॉस्पीटल येथे उपचाराकरिता भरती केले. फिर्यादी यासुध्दा त्यांच्या पतीसोबत दवाखान्यात होत्या. अशा फिर्यादीच्या जबानी रिपोर्टवरून व मेडीकल सर्टी. वरून सदरचा गुन्हा दाखल करून तपासात घेतला.<br>विलंबाचे कारण - फिर्यादी कडुन.<br>तपास अधिकारी - PSI गजानन बोरवार, पो.स्टे. बडनेरा, अम. शहर. मो.नं. ८८८८८०५७७१५ |
| २ | बडनेरा | अप.नं. ७९०/२२ कलम १५३A, ५००, ५०१, ५०२, ५०४, ३४ भा. दं. वि. | हेतुपुरस्सर जातीय द्वेष पसरवुन सामाजिक सद्भाव बिघडविणारे वृत्त लोकसत्ता | - | ज्ञानेश्वरी शिक्षक कांलनी, नवी वस्ती, बडनेरा. | दि. ०८.१०.२२ चे १०.०० वा. | दि. १६.१०.२२ चे १४.११ वा. | शिवराय भास्करराव कुलकर्णी, वय ५३ वर्षे, व्यवसाय - प्रवक्ता भा.ज.पा., रा. | १)गिरीष कुबेर, २) राजेश्वर ठाकरे, ३) लोकसत्ता वृत्तपत्राचे अनोळखी मालक | सहा.पो.आ. श्री. दत्तात्रय ढोले, फ्रेजरपुरा विभाग, अम. शहर , व.पो.नि. बाबाराव अवचार, पो.नि. विजय दिघे, पोउपनि. | हकीकत अशाप्रकारे आहे की, राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक श्री. डॉ. मोहन भागवत यांनी नागपुरात शुक्रवार ७ ऑक्टोबर २०२२ रोजी झालेल्या एका पुस्तक प्रकाशनाच्या कार्यक्रमात भाषण केले. या कार्यक्रमाचे वृत्त लोकसत्ता या दैनिक वृत्तपत्राने ०८ ऑक्टोबर २०२२ रोजी प्रकाशित केले. या बातमीत त्यांनी न बोललेले शब्द त्यांच्या तोंडी घालण्यात आले. ते न बोललेले वाक्य त्यांच्या तोंडी हेतुपुरस्सर घालण्यात आले आणि बातमी छापण्यात आली. लोकसत्ता या दैनिकाने |

| | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | या दैनिक वृत्तपत्राने प्रकाशित केल्याबद्दल | | | | | ज्ञानेश्वरी शिक्षक कांलनी, नवी वस्ती, बडनेरा. | ( अटक नाही ) | गजानन बोरवार<br><br>दि. १६/१०/२०२२ चे १४/०० वा. ते १४/४५ वा. | डॉ. भागवत यांच्या सुधारणावादाविषयी गैरसमज पसरविणारे वृत्त प्रकाशित करून एका समाजाला दुखावुन , अपमान करून समाजाच्या रोषास कारणीभुत ठरले. लोकसत्ता दैनिकाने समाज या शब्दाचे मुद्दाम चुकीचे interpretation करून एका ठराविक जातीचा अवमान करून इतर जातींना चिथावणी देऊन जातीय सद्भाव खराब करणारे खोटे व गैरसमज पसरविणारे वृत्त प्रकाशित करून हेतुपरस्सर जातीय भेद केला. अशा फिर्यादीच्य लेखी रिपोर्टवरून सदरचा गुन्हा दाखल करून तपासात घेतला.<br>विलंबाचे कारण - फिर्यादीकडुन विलंब<br>तपास अधिकारी - PSI गजानन बोरवार, पो.स्टे. बडनेरा, अम. शहर. मो.नं. ८८८८८०५७७१५ |
| ३ | फ्रेजरपुरा अमरावती शहर | ६६७/२०२२ कलम ३२४ भादवी | दुखापत | निरंक | फ्रेजरपुरा अमरावती | दि १५/१०/२०२२ चे २२/३० वा. | १६/१०/२०२२ चे १५/३८ वा. | एक महिला | यश सुरेंद्र कळसकर वय १९ वर्ष रा आंबेडकर शाळेजवळ फ्रेजरपुरा अमरावती | पोउपनी राठोड पो स्टे फ्रेजरपुरा अमरावती शहर दि १६/१०/२०२२चे १६/०० ते १६/४० वा दरम्यान<br><br>प्राथमिक तपास पोउपनी राठोड पो स्टे फ्रेजरुपा अमरातवी शहर | हकिकत अशा प्रकारे आहे कि, दुपारी १५/०० वा चे सुमारास फि ची मुलगी हिचे मोबाइल क्रं वर आरोपी ने त्याचे मो क्रं क्रमांका वरुन फोन करुन काहीतरी म्हटले म्हणुन फि, चा मुलगा हा आरोपीला समजाविण्या करीता त्याच्या घराजवळ गेला असता तु माझया बहीणीला कशासाठी फोन केला विचारपुस करीत असतांना आरोपीने घरातुन लोखंडी पाइप आणुन त्याच्या डोक्यावर मारुन जख्मी केले डोक्यातुन रक्त निघत असल्यामुळे मोहल्लयातील दोन मुले यांनी ईर्विन दवाखाना येथे नेले व पुन्हा सुयश हॉस्पीटल मधे नेवुन डॉ. यांनी तपासणी करुन आदीत्यच्या डोक्याच्या जख्मेला अकरा आके मारले व भरती राहण्यास सांगीतले अशा फिर्यादीच्या जबानि रिपोर्ट वरुन व मेडीकल सर्टिवरुन सदरचा गुन्हा दाखल करुन तपासात घेतला. |
| ४ | पो.स्टे.भातकुली. | 195/2022 कलम 324, 506, 34 भादंवी. | सलाखने मारहाण व धमकीदिली | निरंक. | ग्रामखालकोनीगावातजाणारारोडवरील | दि.15.10.22 रोजीचे 20.30 वाजता. | दि.16.10.22 रोजीचे 00.23वाजता | पानदास उत्तमराव रौराळे वय 45 वर्ष | 1एक महिला 2- वानखडे नावाचा इसम वय 27 रा महेद्र कॉलनी अमरावती 3- अनोळखी | सहा.पोउपनि मधुकर धनोकार ब.नं.763, पो.स्टे.भातकुली.<br><br>दि.16.10.22 रोजीचे 00.20 | .हकीकत अशा प्रकारे आहे की, यातील आरोपी क्रमांक 1 ही फिर्यादी ची पत्नी असुन त्यांची दोन वर्षापुर्वी स्टँम्प पेपरवर लिहुन कच्ची फारकती झालेली आहे तेव्हा पासुन ती आरोपी क्रमांक 2 सोबत राहत आहे. फिर्यादी ला आरोपी क्र 1.हिचे पासुन 2 मुले असुन ती मुले फिर्यादी जवळ राहतत. यातील नमुद घटना ता वेळी व ठिकाणी यातील फिर्यादी व मुले घरी असतांना आरोपी क्रमांक 1,2 असे फिर्यादी चे घरी आले व |

| | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | | | इसम<br><br>अटक नाही | वाजता. | म्हणत होते की, तु कसा जगतो तुला पाहुन घेतो असी धमकी दिली. त्याच वेळी पुन्हा तिथे यातील आरोपी क्र 3 हा आला व आरोपी क्र. 2 यांने फिर्यादी चे डाव्या डोळयाचे वर सतुर सारखे अवजारा ने मारले तसेच आरोपीकर 3 हा सलाख घेवुन मारण्या करीता उभा होता तिथे गावातील लोक जमा झाल्याने ते आरोपी क्र 2, 3, हे तेथुन पळुन गेले अशा फिर्यादीचे जबानी रिपोर्ट वरुन व जख्मीचे मेडी सर्टी वरुन सदरचा गुन्हा दाखल करुन तपासात घेतला. |